
# नवनीत

प्रगत शिक्षण संस्था.फलटण

वार्षिक पत्रिका १९९६



# आठवणीतले फोटो



त्यावेळी कमला निंबकर बालभवनमधला चौथीतला वसिम मणेर आशाताईंशी बोलताना.
बाजूला शुभांगी विडवे.



मंजूताई चौथीतल्या वर्गाला भूगोल शिकवताना

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

## वार्षिक पत्रिका

# नवनीत

ऑगस्ट १९९६

**संपादकीय मंडळ**
आशाताई रुद्रभटे
रविंद्र गायकवाड
प्रकाश अनभुले
नूरी राजवंशी
महेश सावंत

**संपादक**
प्रकाश अनभुले

**संपादकीय साहाय्य**
डॉ. मॅक्सीन बर्नसन
डॉ. मंजिरी निमकर

**रेखाचित्रे**
किशोर माने
वसिम मणेर

**मुखपृष्ठ**
डॉ. मंजिरी निमकर
संदीप कवडे

**प्रकाशन :** प्रगत शिक्षण संस्था, फलटण, टपाल पेटी ५५, जिल्हा सातारा
पिन कोड ४१५५२३, फोन : ०२१६६-२३३२४

**संगणकीय अक्षरजुळणी :** कमला निंबकर बालभवन, इ. १० वी

**मुद्रण :** स्क्रीन आर्टस्, फलटण; अक्षरछाया, पुणे

# अनुक्रमणिका


आभाराचे चार शब्द / मॅक्सीन बर्नसन / तीन
विस्मयचकीत करणारा कलात्मकतेचा अविष्कार / मीना चंदावरकर / चार
संपादकीय / प्रकाश अनभुले / सहा
दादासाहेब अभ्यंकरांचा परिचय / डॉ. आनंद कर्वे / ९
माझी आई / मधुरा राजवंशी / ११
आई (कविता) / श्रद्धा, सुहास, सायली / १२
शब्दांचा खेळ (कविता) / महेश, रचना, मनीषा, स्नेहल / १३
माझ्या शाळेची कहानी / प्रकाश अनभुले / १४
शाळा (कविता) / वैदेही, वेदवती, सोनल, वसिम / १८
सहल / प्रिया अहिवळे / १९
काळ आला होता पण . . . / धनश्री जोशी / २०
पक्षी जाय दिगंतरा / शेखर मेटकरी / २१
निसर्ग (कविता) / नादिया, मोसमी, अश्विन, समीरा / २२
अविस्मरणीय प्रसंग / अश्विन जोशी / २३
आमचा कॅम्प / शेखर कांबळे / २५
चंडोल / वसिम मणेर / २६
घुबी / समीरा कुरेशी / २८
लांडग्याच्या शोधात / धनंजय निंबाळकर / २९
श्रमाची फुले / श्रेयस केसकर / ३१
चिमणी (कविता) / सुप्रिया / ३१
वसंत ऋतू / योगेश काळे / ३२
तीन भुतांची करामत / प्रकाश अनभुले / ३३
घर अन् इतर काही (कविता) / अमृता, गौरी, अमेय, सुहास / ३५
गोष्ट दुर्दैवी विबळ्याची / नूरी राजवंशी / ३६
चालू घडामोडी (कविता) / स्वरजीत, अभिजित, किशोर, योगेश / ३८
ताडोबाचे दिवस (कविता) / समीरा / ३९
निरोप (कविता) / महेश, प्रकाश / ४०

# आभाराचे चार शब्द

'नवनीत' ही प्रगत शिक्षण संस्थेची पहिली वार्षिक पत्रिका प्रसिद्ध करीत असताना फार आनंद वाटतो. संस्थेच्या अध्यक्षा मीना चंदावरकर आणि पत्रिकेचा संपादक इयत्ता दहावीतला विद्यार्थी प्रकाश अनभुले या दोघांच्या प्रस्तावनांत सुंदर रसास्वाद झाल्यामुळे मी पत्रिकेच्या मजकुराबद्दल लिहिण्याची गरज नाही. मात्र ज्या अनेक लोकांनी ही पत्रिका काढण्यास मदत केली त्यांचे आभार मानायला पाहिजे.

मुलांच्या लेखनास अनेक शिक्षकांनी प्रोत्साहन दिले तरी आशाताई रुद्रभटे आणि रविंद्र गायकवाड या दोघांनी केलेले काम विशेष उल्लेखनीय आहे. शिवाय मागच्या दोनतीन वर्षांत माझ्या सहकारी मंजिरी निमकर यांनी केलेल्या प्रयत्नामुळे मुलांना लिहिण्याची नवी स्फूर्ती आली. मंजूताईंनी पुढाकार घेतला म्हणून या पत्रिकेच्या कामास गती मिळाली.

साहित्य जुळवण्याचे काम मुख्यतः मागच्या शैक्षणिक वर्षी झाल्यामुळे मागच्या वर्षी ज्या इयत्तेत विद्यार्थी होते त्याचा उल्लेख केला गेला आहे. लिखाण पूर्वीचे असेल तर ते कोणत्या इयत्तेत लिहिले गेले याची नोंद आहे.

मुखपृष्ठाचे डिझाइन मंजूताई व चित्रकलेचे शिक्षक संदीप कवडे यांनी केले. मुखपृष्ठाचे स्क्रीन प्रिंटिंग संदीपसरांनी केले. आतील चित्रे (सध्याचे) दहावीतले विद्यार्थी किशोर माने आणि वसिम मणेर यांनी काढली.

पत्रिकेचे काम करीत असताना विद्यार्थ्यांना लेखन आणि चित्रकलेशिवाय संगणक वापरण्याचा अनुभवही मिळाला. प्रकाशने देवनागरी लिपीची जुळणी शिकून वर्गमित्रमैत्रिणींना (आणि काही शिक्षकांनाही!) शिकवले आणि अनेक मुलांनी जुळणी करण्यास हातभार लावला, हे विशेष कौतुकास्पद आहे. मुलांचे ज्ञान आणि कौशल्य अजून अपुरे असल्याने त्यांनी केलेल्या कामाची बरीच सुधारणा पुण्यातील 'अक्षरछाया' यांच्याकडून करून घ्यावी लागली. ती सुधारणा करीत असताना अक्षरछायाचे निनाद माटे आणि राजश्री साधू या दोघांना वैताग झालेला असणार, याची आम्हाला जाणीव आहे. त्यांची सहनशीलता व सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत. प्रुफे तपासायला जाई निंबकर यांची मदत मिळाली.

ट्रॅव्हल कोर्नर प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांनी ही पत्रिका काढायला आर्थिक साहाय्य दिले, याबद्दल आम्ही आभारी आहोत.

मॅक्सीन बर्नसन
संचालिका, प्रगत शिक्षण संस्था

# विस्मयचकित करणारा कलात्मकतेचा अविष्कार

मुलांच्या अत्यंत सर्जनशील आणि कलात्मक आविष्काराला वय वाढलेल्या माणसानं प्रस्तावना लिहून काहीतरी ठिगळ जोडणं हे बरं नाहीच. त्यामुळे ही प्रस्तावना नसून, मुलांचं मनापासून केलेलं कौतुक आणि रसास्वाद आहे. शिवाय या सर्जनाला वाव आणि प्रोत्साहन देणाऱ्या मोठ्या माणसांचं मनःपूर्वक अभिनंदन आहे. वाढत्या-उमलत्या कलांकुरांना खुरडून जाऊ न देता, मायेनं आणि नेमक्या विचारांनी जोपासून त्यांचं उमलणं साध्य करणाऱ्यांना दिलेले हे धन्यवाद आहेत.

पहिली-दुसरीपासून ते नववी-दहावीपर्यंतची मुलं आपलं मन कागदावर मोकळं करताना कलात्मक आविष्काराबरोबरच आजूबाजूच्या जगाचं केवढं मोठं भान ठेवतायत हे वाचून अतिशय आनंद तर होतोच; परंतु अशा प्रकारे लिहिणाऱ्या मुलांच्या हातात त्यांचं आणि निदान त्यांच्या भोवतालच्या जगाचं भवितव्य सुरक्षित आहे याची आश्वासक जाणीव आपल्याला होते.

एक शिक्षिका म्हणून माझा असा ठाम विश्वास आहे की बाल्यापासून कलात्मक अभिव्यक्तीची संधी ज्यांना मिळू शकते, त्या मुलांना प्रौढ वयात माणूस म्हणून रसरशीतपणे जीवनाचा आस्वाद घेता येतो आणि आपल्यातल्या माणूसपणाची पखरण इतरांवर सहजगत्या करता येते, खऱ्या माणुसकीनं जगता येतं. 'नवनीत' मधल्या पानापानांवर लिहिलेल्या ओळींनी माझा हा विश्वास अधिक बळकट केला. 'माझा एक हात मी कविता करण्याकरता ठेवलेला आहे' असं सहजतः प्रकाश अनभुले लिहून जातो आणि 'कल्पना म्हणजे माळावरचं गवत नाही, केव्हाही डोक्यात यायला, विचारांनी सात वर्षं जायला लागतात, कल्पनेची एक कारवी फुलायला' असं महेश सावंत म्हणतो.

श्रद्धा केसकर लिहिते, 'आईच्या अबोल्याने वाटले, मला विश्वच नाही'. चौथीतल्या वैदेही-वेदवती म्हणतात, 'बालपण मजेत गेले, आता मोठेपण आहे'. त्यांच्या 'मोठे' पणाच्या गांभीर्याने आपल्याला कौतुकाचं हसू येतं.

नादिया कुरेशीच्या 'दऱ्या डोंगर, आकाश निळसर, पडके देऊळ, घुबड वटवाघूळ' ह्या ओळींमधले दृश्याभास आणि नादमयता मनाला भुरळ घालणारी आहे. तिची ही सगळी कविताच मुळी बालकवींशी नातं सांगणारी आहे. मोसमी शेखला शाळेत न जावं लागणाऱ्या कोकिळेचा वाटणारा हेवा अगदी बालसदृश आहे, तर शेखर मेटकरीच्या 'पक्षी जाय

दिगंतरा' मधलं शेवटचं वाक्य '(घरटे) कुणाचे का असेना, त्याची आठवण म्हणून मी ते ठेवून घेतले आहे' – त्यातला तत्त्वविचार प्रगल्भ आहे.

'नवनीत' मधे निसर्ग वाचविण्याची मुलांनी आकांक्षा पानापानातून दिसते. तशीच भोवतालच्या जगातल्या क्रौर्याची आणि बध्थडपणाची जाणही. 'रोजचे वर्तमानपत्र खून, चोऱ्या, दरोडे यांनी भरलेले असते, थोडीशी जागा असते ती राजकारणातल्या भ्रष्टाचारासाठी', हे नूरी राजवंशीचं वाक्य वाचून मोठे लोक कसले धडे मुलांना घालून देतायत हे जसं कळतं, तशी आणखीही एक महत्त्वाची गोष्ट कळते ती म्हणजे – एखादीच चांगली शाळा, चांगले शिक्षक आणि आईबाबा सध्याच्या भ्रष्ट वातावरणातही मुलांमधला विवेक जागता करून त्यांना सामाजिकतेचं शिक्षण आणि भान देऊ शकतात. कोमल नलवडेचा 'हे यापुढे होणार नाही' हा लेख म्हणजे याच जाणीवेचा प्रत्यय आहे.

लेखन नेहमीच्या विषयांवरचंच आहे – सहली, प्रवासवर्णनं, निसर्गचित्रं, कविता, माझी आई, अविस्मरणीय प्रसंग – आणि ते तसे हवेतच. परंतु लेखन कोणत्याही प्रकारचं असो, मुलांनी त्यातून केलेल्या त्यांच्या कलात्मकतेचा अविष्कार, त्यांचे स्वतंत्र विचार, आजूबाजूच्या परिसराचं, जगाचं, माणसाचं भान, तकलादू खोटेपणाची चीड, बहरलेल्या जाणीवा आणि भाषाशैली या सगळ्या गोष्टी मोठ्यांचं मन विस्मयचकित करणाऱ्या आहेत, अतिसुंदर आहेत.

ह्याचं कारण एकच. त्यांची शाळा आणि खऱ्या अर्थानं त्यांना शिक्षणाप्रत नेणारी त्या शाळेतली माणसं. मॅक्सीनआजी, मंजूताई, आशाताई, . . . यांच्यासारखी. त्यांचा शिक्षणविषयक विचार प्रखर आणि त्यांचं मुलांवरचं प्रेम अस्सल असल्यानंच केवळ त्यांच्या मुलांची मनं अशा प्रकारच्या वाङ्मयाची निर्मिती करू शकली.

या सर्वांचं कौतुक करावं तेवढं कमीच!

मीना चंदावरकर
अध्यक्ष, प्रगत शिक्षण संस्था

# संपादकीय

'नवनीत' ही आमच्या शाळेची वार्षिक पत्रिका आपल्यासमोर आणताना मला फारच आनंद वाटतोय. ज्या शाळेत मी घडलो आणि सतत काही नवीन शिकतोय अशा आमच्या काही वर्षांच्या प्रवासात एक मोठं स्थान आहे ते साहित्याचं! ते साहित्य की जे मुलांच्या मनातून उस्फूर्तपणे उफाळून आले व ते मुलांच्या आकलन, लेखन शैलीचं प्रतिक आहे.

जेव्हा जेव्हा एकटेपणा, आनंद, प्रेम, दुःख या वेदनांनी शाळेतील मुलांच्या मनावर थैमान घातलं त्या त्या वेळी त्यांनी त्यावर मात करून साहित्याची निर्मिती केली. मानवी जीवनातील वेगवेगळ्या आणि रोज त्यांच्या जगात घडणाऱ्या गोष्टींबद्दल त्यांनी काही व्यक्त केलं आणि ते कुठंतरी कोरलं, मतात चित्र उभं केलं आणि त्याचं चित्रण आपल्या लेखणीतून केलं. या साऱ्यातूनच ही वार्षिक पत्रिका आज आपल्यासमोर आली आहे.

मुलांच्या पर्यायी माझ्याही साहित्याचा जन्म कसा झाला? तर त्याचं उत्तर आहे आमचे शिक्षक! घरी आई व शाळेत बाई या दोन नात्यात कधीच फरक वाटला नाही. आईनं मुलांना बोलायला शिकवावं आणि बाईंनी त्या बोलण्यास समृद्ध करून हातात लेखणी द्यावी असा अनुभव मी स्वतः गेल्या नऊ वर्षांत घेतला आहे. गेल्या वर्षापासून साहित्य प्रवास जरा आगळ्या वेगळ्या दिशेने मार्ग आक्रमित आहे. केवळ मानवी जीवनाकडे ढापण्या लावून न पाहता ज्यानं ही मानवजात निर्माण केली त्या निसर्गाकडे पाहण्याची एक निरीक्षणशक्ती या वयातच इथे उमललेली दिसते.

घुबीवर असणारे प्रेम आपल्या लेखणीतून उतरवून समीरानं ह्रदयाला स्पर्शून जाणारं साहित्य निर्माण केलं तर निसर्ग निरीक्षणाची दृष्टी प्राप्त होऊन चंडोलाचं उत्कृष्ट निरीक्षण करून वसिमने जरा शास्त्रशुद्ध पद्धतीला हात घातलेला दिसतो.

निसर्गातील एखाद्या घटकावर मानवी पैशाचिक आक्रमणाला पाहून वाईट न वाटता एका निसर्गप्रिमीचे मन पेटून उठले पाहिजे हे आपल्याला "बिबट्या" नावाचा नूरीचा लेख सांगून जातो. निसर्गातील सहल ही केवळ पिकनिक नसते, त्यात खूप काही पाहता येतं, अनुभवता येतं हे आपल्या अनुभवातून अश्विन वैचारिकपणे मांडतो. तर आमचा धनंजय एका खेडूत मित्राबरोबर लांडग्याची माहिती कशी काढतो हे त्याच्या 'लांडग्याच्या शोधात' या लेखातून समजते आणि त्याच्या मनातील

लांडगा किशोर आपल्या अप्रतिम चित्रातून रेखाटतो.

महेशच्या 'चारोळ्या' कुठंतरी काहीतरी लपलंय हे सांगू पाहतात. लहान मुलांचं साहित्य तर अप्रतिमच अशा साहित्याचं प्रतिक आहे.

अशा सर्वांगीण साहित्याचा मला अभ्यास करायला मिळाला. यातून मला एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे इतर नामांकीत लेखकांपेक्षा कुठंतरी आपलं वेगळंसं अस्तित्व निर्माण करणारी या मुलांची शैली आहे. अशा साहित्याचा शाश्वत आनंद आपणांस व मला सतत घेता यावा हीच प्रार्थना!

प्रकाश अनभुले

*Best Compliments*

*from*

**Travel Corner Pvt. Ltd.**

Deccan Gymkhana, Pune 411004

*IATA Approved Travel Agents*


Tel. 321369, 321760, 322825

# दादासाहेब अभ्यंकरांचा परिचय

डॉ. आनंद कर्वे

*दि. २६ फेब्रुवारी १९९५ रोजी कमला निंबकर बालभवन येथील कै. दादासाहेब अभ्यंकर प्रयोगशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. आनंद कर्वे यांनी केलेल्या भाषणाचा वृत्तांत.*

दादासाहेब अभ्यंकर यांचा आणि माझा परिचय फारच अल्प काळाचा, म्हणजे सुमारे ६-७ वर्षांचाच होता. मला वाटते, डॉ. बाळ द. टिळक हे नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे संचालक असताना त्यांच्यावरोबर मी प्रथम दादासाहेबांकडे गेलो



होतो, परंतु पहिल्या भेटीतच दादांनी आपल्या स्वभाव वैशिष्ट्यांनी मला भारावून टाकले. अत्यंत दिलदार व जनसंग्राहक वृत्तीच्या दादांच्या भोवती नेहमीच विविध क्षेत्रातल्या व्यक्तींची गर्दी असे. यात त्यांच्या धंद्यातल्या महत्त्वाच्या व्यक्ती तर असतच पण शिवाय प्रख्यात शास्त्रज्ञ, साहित्यिक, प्रशासक व राजकारणी हेही असत. दादांच्या जेवणाच्या टेबलावर तर दहाबारापेक्षा कमी व्यक्ती पाहिल्याचे मला आठवतच नाही.

दादासाहेबांचा जन्म कुलावा जिल्ह्यातल्या वैजनाथ या गावी सन १९२३ मध्ये झाला. त्यांनी अर्थशास्त्रात बी.ए. ची पदवी संपादन केली आणि १९४८ साली म्हणजे वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी आपले मामा श्री. धामणकर यांच्या भागीदारीत होम इंडस्ट्रीज अँड कंपनी या नावाने एक रसायननिर्मितीचा उद्योग मुंबईत सुरू केला.

दुसऱ्या महायुद्धाने युरोप व जपानमधील कारखानदारी मोठ्या प्रमाणावर नष्ट झाल्याने जगात रसायनांचा तुटवडाच होता. अशा या काळात

मुंबईतला रसायननिर्मितीचा उद्योग खूप झपाट्याने वाढत गेला. आज जपान व जर्मनीच्या तोडीचे रासायनिक उद्योगाचे क्षेत्र म्हणून मुंबईला जे महत्त्व आहे ते मिळवून देण्यात दादासाहेबांसारख्या उद्योजकांचा मोठा हातभार लागलेला आहे. १९५९ साली दादासाहेबांच्या धुरीणत्वाखालील होम इंडस्ट्रीज अँड कंपनी या भागीदारीच्या व्यवसायाचे हायको प्रॉडक्ट्स् प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत रूपांतर झाले आणि १९७९ साली तिचे पब्लिक लिमिटेड कंपनीत रूपांतर करण्यात आले. त्या काळी या कंपनीचे शेअर किती दुर्मीळ होते हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे.

दादासाहेबांचे शिक्षण जरी कलाशाखेतील होते तरी त्यांनी रसायनशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. १९७२ साली ते टोरोंटो येथे गेले असता सुमारे ८० पेपर टेक्नॉलॉजिस्ट बरोबर झालेल्या एका गटचर्चेत त्यांनी भाग घेतला होता. शास्त्रांपैकी रसायन, भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी इ. विविध विषयांवरचे त्यांचे प्रभुत्व पाहून शेवटी एकाने त्यांना विचारले की तुम्ही कोणत्या विषयांचे डॉक्टर आहात? जेव्हा दादासाहेबांनी सांगितले की ते केवळ कलाशाखेचे पदवीधर आहेत, तेव्हा ऐकणारे चाटच पडले.

सर्वसामान्यांना लागणाऱ्या साबण, फिनेल, औषधे किंवा कीटकनाशके अशा पदार्थांच्या निर्मितीत न पडल्याने हायको प्रॉडक्ट्स् या उद्योगाचं नाव जनसामान्यांना माहिती नाही. परंतु रसायनांच्या धंद्यात नवनवीन प्रयोग आणि भारतात आयात कराव्या लागणाऱ्या रसायनांची देशांतर्गत निर्मिती करणारी कंपनी म्हणून हायको प्रॉडक्टस्ने या धंद्यातल्या जाणकारांकडून अनेकदा दाद घेतली आहे. यांपैकी एथिलीन ऑक्साइड् कंडेन्सेटस् आणि कंटिन्युअम सल्फोनेशन यांचा उल्लेख करावा लागेल. क्लोरोसिलेन्स् या गटातील रसायनांचा एक नवा प्रकल्पही त्यांनी रायगड जिल्ह्यात खरसुंडी येथे उभारण्यास सुरवात केली होती पण १९८१ मध्ये त्यांना अचानक मृत्यू आल्याने हे कार्य अर्धवटच राहिले.

दादासाहेबांनी आपल्या हयातीतच अभ्यंकर ट्रस्ट या नावाने एक विश्वस्तनिधी सुरू केला होता. एखाद्या वटवृक्षाच्या आधाराने शेकडो पक्षांचे संसार चालावेत, त्याचप्रमाणे अनेक सार्वजनिक संस्थांना अभ्यंकर ट्रस्टने आधार दिला आहे. आज आपल्या प्रगत शिक्षण संस्थेला प्रयोगशाळा स्थापण्यासाठी या थोर महापुरुषाच्या नावाने त्यांच्या पत्नी श्रीमती मंगलाताई अभ्यंकर यांनी उदार देणगी दिली आहे, त्याबद्दल त्यांचे आणि दादासाहेबांच्या स्मृतीला उजाळा देणाऱ्या या संस्थेच्या चालकांचे मी आभार मानतो.

□

# माझी आई

मधुरा राजवंशी, इ. ५ वी

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी ही कवी यशवंत यांच्या 'आई' या कवितेतील ओळ. याचा अर्थ असा की स्वर्ग, पृथ्वी व पाताळ या तिन्ही जगांचा जो राजा असेल व त्याला आई नसेल तर तो भिकारी ठरतो. पण भिकारी का बरे ठरतो? कारण ज्याला आई नाही त्याला मातेचे प्रेम नाही. आई नसल्यावर कसे वाटत असेल त्याला? आपल्याला बुआ आई आहे बरं. नाहीतर तशी अवस्था



व्हायची. माझी आई मला खूप आवडते. तसं म्हटलं तर सगळ्यांनाच आपली आई आवडते. आता तुम्हाला वाटलं असेल की माझी आई खूप प्रेमळ आहे. म्हटली तर प्रेमळ आहे म्हटली तर नाही. कधीकधी मला आई रागवते, मारतेही.

एखादेवेळी आईने मला कार्टून बघताना काही कामासाठी बोलवले तर असा राग येतो ना आईचा की वाटतं आईच नसती तर किती बरं झालं असतं!

पण नंतर माझा विचार बदलतो. आईनं मायेनं जवळ घेतलं की वाटतं आईनं आपल्याला कधीच सोडून जाऊ नये. पण अशी वेळ कधीतरी येणारच आहे. आई कधीतरी सोडून जाणारच आहे. आई गावाला गेली की सारखी तिचीच आठवण येते. जेवण तयार करणं, डबा भरणं ही आईचीच कामं. तसं म्हटलं तर कामवाली बाईही आईला मदत करतेच. पण आईचं जेवढं प्रेम मिळतं तेवढं कामवाल्या बाईचं प्रेम मिळत नाही. आईसारखे दैवत साऱ्या जगात नाही. म्हणजे आईसारखा देव साऱ्या जगात कुठेही नाही. आईशिवाय कुणाला दैवतच मानता येणार नाही. पण आईला मात्र वाटत असणार की मी शिकून खूप मोठं व्हावं, डॉक्टर व्हावं. आणि मी सुद्धा आईचं स्वप्न कधीतरी पूर्ण करीन हे खरं.

□

# आई

### अंगाई

रात्र ही काळोखाची
झोपरे आता बाळा
पशु-पक्षी नाही कुणी
अंधार झाला काळा-काळा
चांदण्यारात्रीत ह्यो
फुफाटाही दिसतो छान
चांदी ल्याले बघ झाडाचे खोड आणि पान
काळ्या रानातून वारा फिरतो
थंडपणे, शांतपणे तो वाहतो
रात्र ही काळोखाची . . . .

सुहास माने
इ. ८ वी

### आई

माझी आई माझी आई
सदा असते तिची घाई.
सकाळी लवकर उठते
काम करू लागते.
आमच्या बरोबर शाळेत येते
घरी आल्यावर कुशीत घेते.

सायली नेवसे
इ. ३ री

□

### आईचा अबोला

आई जर बोलली नाही
तर मला करमत नाही
आई जर बोलली नाही
तर मला जेवावे खावे वाटत नाही
पण मला ठाऊक आहे
ती बोलली नाही जरी
तरी प्रेम करते माझ्यावरी
आईच्या अबोल्याने वाटले
मला विश्वच नाही
पण माझी मला चूक कळली
मी जर आईचे ऐकले असते
तर असे घडलेच नसते.

श्रद्धा केसकर
इ. ७ वी

### छोटा नंदकिशोर

चुपकेसे आता है, चोरी यह करता है
मक्खन, दही खाता है, फिर भाग जाता है
छोटा नंदकिशोर ॥१॥

बच्चों के साथ शोर मचाता है
गाय चराने ले जाता है
वहाँ खेलता है, मौज मनाता है
छोटा नंदकिशोर ॥२॥

गोपियों के घर आता है
मक्खन, दही चुराता है
खाने में होता है दंग
गोपियों को करता तंग
बच्चों के साथ मौज मनाके करता है शोर
छोटा नंदकिशोर ॥३॥

सुहास माने
इ. ८ वी

# शब्दांचा खेळ

**पंखेदादा**

पंखेदादा पंखेदादा फिरता सारखे गरगर
इकडे तिकडे मान वळविता,
काय हो शोधता घरभर?
टेबलावरती उभे राहून
चहूकडे फिरविता मान
सभेतल्या वक्त्यासारखे
देत असता जणू व्याख्यान.
दिवसभर त्या कॅलेंडरची
पाने उलटत बसता
सारख्या एवढ्या कशासाठी
तारखा पाहत असता?
पोलिसासारखे उभे राहून
करीत असता हातवारे
हातासारखी पाती फिरवून
तुम्ही घालता थंड वारे.

महेश सावंत
इ. ७ वीत असताना

**बाहुली**

मला आवडते बाहुली
मी तिचे नाव ठेवले सावली
ती मला सारखी बोलावते
मी फार कंटाळते.

रचना पाटील
इ. १ ली

**मनीमाऊ**

म्याव म्याव करते, चपाती चोरून खाते
पिल्लांना हात लावला की बोचकरते
मात्र कधी कधी चावते
कुत्र्याला घाबरते फार,
भांडण करते जोरदार
कधीकधी म्हणे पिल्लांना पण खाते
एरवी मात्र पिल्लांपाशी बसते
मनीमाऊपासून सावध रहा,
कधीकधी रक्त काढते बघा
मनीमाऊ आहे हुशार
तिच्यापुढे माणसाचे चालत नाही फार.

मनीषा ढेंबरे
इ. ५ वी

**पाऊस**

पाऊस आला पाऊस आला
गंमत भारी वाटे मला
झाडे वेली डोलू लागल्या
आनंदाने गाऊ लागल्या
पाऊस आला पाऊस आला.

स्नेहल कुमठेकर
इ. १ ली

# माझ्या शाळेची कहानी

प्रकाश अनभुले, इ. ७ वीत असताना

माझ्या शाळेची कहानी जरा अजबच आहे. मला पूर्वी शाळा हे नाव घेतलं की भीती निर्माण व्हायची. याचे कारण म्हणजे शिक्षकच. एखाद्या मुलास शाळा जरी आवडली तरी सरकारी शाळेत गेल्यावर दुसऱ्याच दिवशी तो पळून परत जाणार. कारण शिक्षकांच्या आज्ञेत रहावे यासाठी त्याला मारणे, शिक्षा करणे हे ठरलेलेच असायचे. अशाने मुलांना सरांबद्दल कधीच प्रेम राहणार नाही. नाईलाजाने त्यांच्यासमोर आज्ञापालन करतील पण मागे त्यांच्याबद्दल मनात अनेक वाईट विचार असतील.



माझं नाव नगरपालिकेच्या शाळेत टाकलं. माझा शाळेतील पहिलाच दिवस! सर्व नवीन होतं. मी शाळेच्या ग्राऊंडवर दप्तर घेऊन आलो. भिंती कमजोर होत्या. खिडक्या तुटक्या-फुटक्या, दरवाजाच्या तोंडाशी एक मोठं टेबल. त्यावर मुलांनी सुंदर कोरीव काम केलेलं. सरांचा चेहरा कादलेला. मी टेबलजवळ गेलो. एक पट्टी, खडू, हजेरीपत्रक हे तिथं होतं. टेबलावरच एक व्यक्ती होती. मी आत चाललोच होतो, तोवर सरांनी मला बाहेर जाण्यास सांगितलं. म्हणाले, 'चल बाहेर जा आणि आत येऊ का? असं विचार'. मी तसं केलं. मला दोन नंबर ओळीत बसवलं. आतमधे एक सुविचार होता: 'मुले म्हणजे देवाघरची फुले'. पण इथे तर या फुलांना काट्यांसारखी वागणूक दिली जात होती.

सरांनी शिकवायला सुरवात केली. पहिला तास मराठीचा होता. सरांनी एक धडा घेतला, वाचून दाखवला व प्रत्येकास उभा करून वाचून घेतला. त्याखालील प्रश्न लिहायला सांगून स्वतः बाहेर जाऊन दुसऱ्या सरांबरोबर गप्पा मारू लागले.

मला जास्त कळत नव्हतं. मुलांनी मला नाव विचारलं. नंतर दोन जणांची भांडणे सुरू झाली. मारामारीही झाली. सर रागाने पळत आले. ज्यांनी मारामारी केली ते बाजूलाच राहिले. सरांनी सर्वांना ओळीने

मारायला सुरवात केली. त्यात मलाही मार मिळाला. संध्याकाळी मी घरी आल्यावर सांगणार कुणाला? आई कामावरून आलेली असते. वडील १०-१२ वाजता परत यायचे. मी गप्प बसायचो. दुसऱ्या दिवशी मात्र मी शाळेत जाण्यास नकार द्यायचो. आई मला मारतच शाळेत नेऊन बसवायची. सर का येत नाही हे विचारायचे सोडून मारायलाच सुरवात करायचे. मला फारच वाईट वाटायचं. संध्याकाळी माझ्यासाठी चॉकलेट घेऊन आई मला न्यायला यायची. मी सर्व विसरून घरी यायचो. आईचा मायेचा हात अंगावरून फिरायचा पण सरांचा मात्र मायेचा हात कधीच फिरला नाही.

आई-वडिलांसाठी मुलांना शाळेत जाणं भाग पडायचं. त्या शाळेतील मुलं गरिबीत वाढलेली, चांगले संस्कार न झालेली असायची. त्यामुळे बाकीची मुलेही बिघडायची. मला का कोणास ठाऊक, पण त्यांच्यापासून दूर रहायला आवडायचे.

शाळेजवळच एक मंदिर होतं. तिथं जाऊन मी ओळींना ओळी लावायचो. तेव्हापासून मला कवितेचं वेड होतं, असं आज वाटत आहे. कविता हा शब्द त्या शाळेत माझ्या कानावर पडला. पण लेखकांच्या कविता. स्वतः मुलांना कविता करायला कधीच सांगत नसत. त्यामुळं माझ्या कविता मनातच रहायच्या. वाटायचं आपण या शाळेतून पळून जावं. पण आईची भीती वाटायची आणि असं करू नकोस अशी तिची शिकवणही मिळायची.

या शाळेत आम्हाला सुट्ट्या फारच असायच्या. त्यामुळे मी व माझा मित्र धनंजय विटी-दांडू आणि गोट्या खेळत बसायचो. आमचं सर्व लक्ष खेळावर असायचं. धनंजय माझा लंगोट मित्र होता. आमचं एकमेकांवर अतूट प्रेम होतं. शाळेचा आम्हाला राग येऊ लागला. घरच्यांना आम्ही खूप सांगायचो. पण त्यांना वाटायचं यांना बोंबलत हिंडायला पाहिजे म्हणून ही नाटकं करतात.

नंतर नंतर शाळेचा कंटाळा म्हणण्यापेक्षा सरांचा त्रास वाढला. आम्ही दोघ शाळेचं नाव करून एका मंदिरात जाऊन बसायचो. दोन वाजले की घरी यायचो. घरच्यांना वाटायचं आम्ही



शाळेतच गेलोय, पण आमची तरी काय चूक? खरंच सर खूप मारायचे. मला वाईट वाटायचं ते त्या गरीब गोसावी मुलांचं. अंगावर धड कपडा नाही. पुस्तकं वह्या तर कधीच नसायच्या. तरीही बिचारी

शिकत होती. वाचायला आलं की सारं झालं अशी त्यांच्या शिक्षणाची व्याख्या असायची.

मला फार वाटायचं आपल्याला चांगल्या शाळेत जायला मिळावं. पण ते कधी होणार याचीच सतत हुरहुर....

माझं मन स्वप्नं रंगवू लागायचं. नवीन शाळा कशी असेल? मला वाटायचं शिक्षकांनी समजावून सांगावं, प्रेमानं शिकवावं. ही सर्व स्वप्नं आहेत हे समजल्यावर निराश व्हायचो.

अशीच त्या शाळेत माझी दोन वर्षं गेली. नंतर मात्र सतत गैरहजेरी हे कारण दाखवून मी शाळेला राम राम ठोकला. वडील म्हणाले, तुला नवीन शाळेत टाकतो. काही दिवसांनी मला समजले आमच्या शाळेतील ते सर वारले. मुलांना दुःख झालं नाही. पण मला वाईट वाटलं. कसेही असले तरी माझे ते पहिले सर होते. शाळेतून निघाल्यावर एकदा मी आजारी पडलो. कदाचित हे आजारपणच माझं दुसऱ्या शाळेत जाण्याचं कारण बनलं असावं.

आम्ही त्या वेळी डॉ. मंजुताई यांच्याकडे गेलो. त्यांनी शाळेविषयी विचारलं व नंतर एक चिठ्ठी लिहून दिली. औषधांबरोबर माझं खरं औषध त्यांनी त्यात लिहून दिलं होतं.

वडील कामाला लागले. माझी शाळेत जाण्याची तयारी सुरू झाली. या नव्या शाळेत पुढचा वर्ग नसल्याने मला मागच्या वर्गातच बसावं लागलं होतं. याचं मला दुःखही वाटलं. दुसऱ्या दिवशी सकाळी सायकलवर बसलो. सायकल खूप वेळ चालली होती. मी वडिलांना काहीच विचारलं नव्हतं. शेवटी मी आणि वडील दोन कमानींच्या पुढे गेलो. वडिलांनी सायकल वळविली. पुढे जाताच एक भक्कम इमारत दिसली. तीच माझी नवीन शाळा. जणू मला म्हणायची, 'ये तुझ्या स्वप्नातील आहे मी'.


मी उत्साहाने आत गेलो. खेळणी, सनमायकाचे टेबल, मला फार आनंद झाला. एका बाईंनी मला आत नेलं. मी घाबरलो. बाईंनी गोड आवाजात माझी व मुलांची ओळख करून दिली. मला समाधान वाटलं. खेळ, गाणी करत करत वेळ झाली. मला शाळेतून बाहेर जावंसंच वाटत नव्हतं.

वडील आत आले व वडिलांनी मला चल म्हटले. मी घरी आलो. मला फारच आनंद झाला होता. आई म्हणाली, 'आवडली का शाळा?' मी 'हो' म्हणलं.

दुसरा दिवस कधी येतोय असं झालं होतं. दुसऱ्या दिवशी माझी एका व्यक्तीशी भेट झाली; ज्या व्यक्तीचे माझ्यावर फार फार उपकार आहेत. त्या म्हणजे मॅक्सीन आजी, आमच्या फक्त आज्जी!

खरं तर आज्जी या शब्दात काय लपलंय हे कोणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला नसेल. पण आज मी तो केलाय. आजी म्हणजे आईची आई!

जसं आई आपल्यावर प्रेम करते, तसंच आजींनी आमच्यावर खूप प्रेम केलंय व करतातही. त्यांनी सर्वांना समान वागणूक दिली. त्यांच्याविषयी माझ्या



मनात त्याच दिवशी आदर निर्माण झाला व ती अजूनही आहेच. आजींना मी जिवंत असेपर्यंत कधीच विसरणार नाही.

आजी आम्हाला सांगायच्या. सर्वांनी वर्गात भावंडांप्रमाणं वागावं. आम्ही मुलं/ मुली एकत्रित असतो. एकमेकांशी भावंडं या नात्यानं वर्गात वागत असतो. आज्जी प्रत्येक बारीक गोष्टींचा विचार करायच्या व चांगल्या गोष्टी पटकन ओळखायच्या. मला त्यांचा हा स्वभाव फार फार आवडायचा.

नंतर मी पुढच्या वर्गात गेलो आणि आम्हाला सर्व विषयांसाठी एक शिक्षिका मिळाली. ती म्हणजे आशाताई रुद्रभटे. ह्यांचे तर माझ्यावर सर्वांपेक्षा अधिक उपकार आहेत. कारण ह्यांनीच माझ्या अंगातला एक गुण प्रकाशात आणला. तो म्हणजे काव्यगुण!

काव्यगुण हा माझ्या जीवनाचा एक भाग होता आणि राहणार आहे. माझा एक हात कविता करण्याकरता मी ठेवलेला आहे. पुढे मी मोठा माणूस होवो अथवा न होवो माझ्यातला हा गुण जाणणं म्हणजे एक प्रकारे शोध लावणं. हा शोध आशाताईंनी लावला. त्यांचं शिकवणं आमच्या नीट डोक्यात शिरायचं.

आता मला सारं काही मिळालं होतं. जेव्हा आज मला ती पहिली शाळा आठवते तेव्हा मला खूप वाईट वाटतं. कारण आज माझ्यापेक्षाही खूप चांगले विद्यार्थी तशा शाळांच्या भिंतीत बंद आहेत. आणि किती तरी मुलं तशा शाळांतून रिमांड होममधे जातात व नाही नाही ते करत बसताहेत आणि स्वतःचं आयुष्य आपल्याच हाताने संपवताहेत. पण जी स्थिती माझी झाली होती ती अन्य कोणाची होऊ नये.

□

# शाळा

### चष्मा

एक आमच्या बाई
त्यांची कामाची सतत घाई
बाई आमच्या पडल्या
तरी नाही रडल्या
शाळेत आल्या झटपट
मुले जाग्यावर बसली पटपट
शिकवताना झाली मजा
वाचत होत्या पूजा तिथे बूजा
पाठ झाला समाप्त आणि
रस्त्यावर जाऊन पाहतात
तर चष्मा गुप्त!

वसिम मणेर
इ. ४ थीत असताना

### आठवणी

खूप दिवसांनी
बऱ्याच वर्षांनी
येता आठवणी
माझ्या मनी.
आठवून ते सारे माझ्या मनास येते
गहिवरूनी
बालपण मजेत गेले
आता मोठेपण आले
चेहरे मोहरे बदलले
आता जगही बदलले.
आठवून ते सारे माझे डोळे भरून आले
सवंगडी ते खेळातले
परत कधी न भेटले
होते सुखाचे जे दिवस सरले
कसे ते आता मज कळले
आठवून ते क्षण सारे लगेच
ते दिसेनासे झाले.

वैदेही, वेदवती
इ. ४ थी

### आमच्या बाई

आमच्या बाई छान छान
गोऱ्या गोऱ्या पान पान
शिकवतात पण छान छान
मारत नाहीत कोणाला
गोड बोलुन गोष्ट सांगतात
म्हणूनच मला बाई फार आवडतात.

सोनल शिंदे
इ. २ री

# सहल

प्रिया अहिवळे (आपली शाळा)

मला सहलीला जायला फार आवडते. पण सहली कुणी काढतच नाही. जानेवारीमध्ये मात्र 'आपली शाळा'च्या सहावीच्या मुलांना बालभवनच्या मुलांबरोबर सहलीला नेले. सहलीला आम्ही एस्.टी. केली होती. सहलीच्या दिवशी आम्हाला सहा वाजता बोलावले होते.

आम्ही कमला निंबकर बालभवनला जाऊन थांबलो न थांबलो तोच एस् .टी. आली. आम्हाला सरांनी ओळीने एस्.टी.त बसवले. एस्. टी. सुरू झाली की आम्ही सगळे गाणी म्हणू लागलो. कोणी गाण्याच्या भेंड्या लावत होते तर कोणी नाचत होते. सर्व शिक्षक व विद्यार्थी सहलीचा आनंद लुटत होते.

आम्ही पुण्यात पोहोचल्यावर पहिल्यांदा सर्पउद्यान पाहिले. तेथे वेगवेगळ्या प्रकारचे साप तर पहायला मिळालेच पण प्राणी आणि पक्षीसुध्दा होते. नंतर आम्ही पर्वतीवर चढलो. बाप रे बाप! काय त्या पायऱ्या! चढता चढता आम्हा सर्वांचे पाय दुखून आले. वर गेल्यावर आम्ही तेथील मंदिरे पाहिली. वस्तुसंग्रहालय पाहिले. सगळ्यात गंमत म्हणजे वरून आम्हाला आख्खे पुणे दिसले होते. नंतर आम्ही पर्वतीवर जेवण केले. थोडा वेळ विश्रांती घेऊन परत खाली आलो.

तेथून आम्ही संधिपाद प्राण्यांचे संग्रहालय पहायला गेलो. तेथे कुंभारणीची कंबरेएवढी मोठी घरे पाहिली.

संग्रहालयाजवळ शनिवारवाडा आहे. तेथे आम्ही पेशव्यांच्या तोफा पाहिल्या. चोर रस्ता आणि भुयार पाहिले.

तेथून आम्ही संभाजी पार्क येथे मासे पहायला गेलो. काही माशांच्या अंगावर निरनिराळी चित्रे व रंग होते. तर काहींना रंगच नव्हते. माशांच्या काचेच्या घरात अनेक लहान मोठ्या शिंपल्या ठेवल्या होत्या. तेथे काही मासे मोठे होते तर काही लहान होते. काय ते मासे विजेच्या प्रकाशात छान दिसत होते म्हणून सांगू! तेथे एक खळखळणारा झरा देखील होता. तो जमिनीवर पडत होता तेथे कमळे उगवली होती.

तेथून आम्ही एका मोठ्या शाळेत गेलो. पायऱ्या चढून वर एका मोठ्या हॉलमध्ये गेलो. आम्हाला खुर्चीत बसवून आधी ग्रह ताऱ्यांविषयी माहिती सांगितली. मग अंधार करून सारे ग्रह व नक्षत्रे दाखवली.

पान क्र. २१ वर पहा

# काळ आला होता पण . . .

धनश्री जोशी, इ. ६ वी

सुट्टीचे दिवस होते. सगळी भावंडे आमच्याकडे आली होती. अशाच एका सुट्टीच्या दिवशी आम्ही अंथरुणात असताना विचार करत-करत एकाने टूम काढली की वारुगडला जायचे. मग तोंड धुताना सगळ्या भावंडांची परवानगी लपूनछपून मी घेत होते. आई-बाबांना कोणी सांगायचे हे ठरविता ठरविता ही गोष्ट हळूच बाबांच्या कानावर गेली. मग आई-बाबांनी आम्हाला वेड्यातच काढले. कारण सायकलवरून जायचा निर्णय आईला मूर्खपणाचा वाटला व बाबा म्हणाले की वारुगडच्या दगडधोंड्यात तुम्हाला



काय निसर्ग दिसणार आहे? असे वेगवेगळे प्रश्न विचारून आई-बाबांनी आम्हाला पिडले. पण मी एखादी गोष्ट करायची असे ठरविले की ती मी पूर्ण करतेच. हा माझा विशेष गुण आई-बाबांना माहीत होता. त्यामुळे परवानगी मिळाली.

मग आम्ही ९ च्या रणरणत्या ऊन्हात एव्हरेस्ट सर करायला निघाल्यासारखे निघालो. मजल दरमजल करत गिरवी या सुंदर गावात आलो. खरं तर आम्ही तिथेच अर्धे दमलो होतो. पण दाखवायचे नव्हते ना दमलोय असे! सगळे दमलेले पाहून आम्ही एका खडकावर जाऊन निवांत बसलो. तिथे बाराचे रणरणते ऊन जाणवत होते. त्यामधे अमोलची सायकल पंक्चर झाली. मग पुढे अमोल सायकल डोक्यावर घेऊन निघाला. एकदाचं पोहोचलो पायथ्याशी. तिथे आमच्या ओळखीच्या आजीबाई रहात होत्या. तिथे आम्ही सायकल ठेवून निघालो. थोडे चढलो. तिथेच १ वाजला. आतातर सूर्य खूपच तापला होता. मग तर काय सगळेच घामाघूम झालो. आमच्यातील एक अती आत्मविश्वासी मुलगा अमोल. एका वाळूच्या उंच ढिगाऱ्यावर जाऊन बसला. खाली बोरीची जाळी व वर उंच दगड. तेवढ्यात अमोलच्या चपलांनी बोरीच्या जाळीत आत्महत्या केली. पण त्यामुळे इतका उन्हाळा असून आम्हाला कापरे

पान क्र. २४ वर पहा

KMB.

# पक्षी जाय दिगंतरा!

शेखर मेटकरी, इ. ८ वीत असताना

संध्याकाळचे सहा वाजले होते. मी बाहेर फिरत होतो. मित्रांनी मला गप्पा मारायला बोलावले. गप्पा मारता मारता सात वाजले. गप्पा खूपच रंगल्या होत्या. पण उशीर झाला होता. आम्ही घरी जायला निघणार इतक्यात दोन पक्षी उडता उडता खाली पडले. आधी वाटले ते चिमणा-चिमणीच आहेत. पण जरा नीट पाहिल्यावर लक्षात आहे की हे स्पॉटेड मुनिया आहेत. का बरे पडले असतील हे? विषारी पाणी प्यायले असतील की विषारी फळे खाल्ली असतील?

हळूच रुमालात उचलून दोघांना मी घरी घेउन गेलो. घरी एक चिमणीचे सोडून दिलेले घरटे होते. त्यात मी त्यांना ठेवले. पाणी पाजले. दाणे टाकले. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यागेल्या बाईंना सांगितले. बाई म्हणाल्या संध्याकाळी पक्षी घेऊन ये. संध्याकाळी पुन्हा चारा-पाणी देवून हातावर घेतले. मनात विचार आला, हे कधी उडतील का? विचार आल्या सरशी त्यांना हवेत सोडले. ते धडपडत-धडपडत उडत जावून कुंडीवर जाऊन बसले आणि तिथून उडून गले. मी खूप नाराज झालो. बाईंना जाऊन सांगितले. पण बाई रागावल्या नाहीत. उलट म्हणाल्या, 'अरे बरे झाले ते उडून गेले ते!'

माझ्या मनातला एक प्रश्न मात्र सुटला नाही. ते का पडले असावेत? काही दिवसांनी मला घराजवळ एक स्पॉटेड मुनियाचे घरटे सापडले. हे त्यांचेच असावे का? कुणाचे का असेना त्यांची आठवण म्हणून मी ते ठेवून घेतले आहे.

□

---

पान क्र. १९ वरून

ध्रुवताराही दाखविला. एकदा तर आम्हाला वाटले आम्ही गरगर फिरत आहोत. पण खाली हात गेला की फरशी लागली. म्हणजे आमच्या डोक्यावरचे आकाशच फिरत होते.

अशा तऱ्हेने ८ वाजेपर्यंत आम्ही सर्व मुलांनी व शिक्षकांनी आनंद पुरेपूर लुटला. अशी झाली आमची सहल.

□

# निसर्ग

## निसर्गभ्रमण

दऱ्या-डोंगर
आकाश निळसर
पडके देऊळ
घुबड वटवाघूळ
दारात चाफ्याचे सडे
पडक्या आडाकडे
झऱ्याचे पाणी
मंजुळवाणी
पाचोळा तुडवीत
पक्षी पहात
थंड सावलीत
झोप लागली गाढ.

नादिया कुरेशी
इ. ५ वी

## झाले गेले

झाले गेले विसरून जावे
पुढे चालाया लागावे
करावा शेती आरंभ
करावा झाडा वेलींचा आरंभ
शिकावे आपण खूप
करावे सुखी जगास.

समीरा कुरेशी
इ. ६ वीत असताना

## घरटे

पाऊस पडून गेला होता.
पक्ष्यांचा किलबिलाट सुरू होता.
एक पक्षी मात्र कामात व्यग्र होता.
घरटे विणण्यात मग्न होता.
ओबडधोबड कापसाला आकार येत होता.
पक्ष्याचा उत्साह वाढत होता.
चिमुकल्या पक्ष्याची भरारी मोठी होती.
घरट्याची स्वप्ने रंगत होती.
माती, पिसे, काड्या यांनी घरटे पूर्ण झाले
पक्ष्याच्या मनाला हायसे वाटले.
मधुभक्षिकेने अंडी घातली.
व ती उबवायला बसली.
अशी घरट्याची सांगता झाली.
निसर्गानं अपत्यं जन्माला घातली.

अश्विन जोशी
इ. ७ वीत असताना


## कोकिळा

कुहू कुहू करतेस
सदा न कदा गातच असतेस
ऐटीत बसून झाडावर
गोड फळे खातेस फार
इकडून तिकडे फिरत असतेस
शाळेत न जाता घरीच बसतेस.

मोसमी शेख
इ. २ री

# अविस्मरणीय प्रसंग

अश्विन जोशी, इ. ७ वीत असताना



विश्व प्रकृती निधी-भारत यांच्या सौजन्याने मी दांडेलीला कॅम्पला गेलो होतो. दांडेली जवळील कुळगी गावात आमचे तंबू होते. कर्नाटकातील वनश्रीने नटलेले एक अभयारण्य. बांबू या अभयारण्यात पानांचा गालीचा करतो. पाऊलवाटांवर हत्तींच्या दंगामस्तीमधे पडलेली झाडे असतात. भुश्यासारखी पडलेली हत्तींची लीद असते. त्यावरून हत्तींचा माग काढता येतो.

एक बलाढ्य गजराज बघण्यासाठी गाडीतून एक ग्रूप निघाला होता. गाडी मजल-दरमजल करीत शेवटी टॉवरपाशी आली. एका मोडक्या टॉवरवर मुले दाराच्या जाळीतून चढली तर काही मुले दणकट टॉवरवर गेली. मुले चढून स्थानबद्ध झाल्यावर मोडक्या टॉवरचा हळूच आवाज येई व जंगलाची शांतता

भंग होई. मी मोडक्या टॉवरवर होतो. तो बंदिस्त होता पण दुसरा उघडा होता. मधेच कुजबुज होऊन काहीतरी चाहूल लागल्यासारखी झाली. जंगलात खुरांचा आवाज आला. आणि एकदम २०-२५ गव्यांचा कळप पळत गेला. मग आमचे सर हळूच उतरून निरीक्षण करण्यास गेले तर कळपातून फुटलेला असा आडदांड गजराज सरांना दिसला. सगळयांना माहीत होते की एकटा हत्ती चवताळलेला असतो. पण हे लक्षात न घेता कुणी एकाने हत्तीचा फोटो काढला. तत्क्षणी तो चवताळला आणि एकदम चाल करून आला. आम्हाला वाटले, आता आमचा काळ जवळ आला आहे पण तो टॉवरवर न येता एका झाडावर चालून गेला. त्याने ते झाड एखाद्या खेळण्यातल्या झाडासारखे उपटून काढले. जसे एखाद्या मुलाने खेळणे तोडावे तसे त्या गजराजाने ते झाड तोडले. त्याचे ते मोठाले सुळे जणू रणशिंगच वाजवत होते. त्याचे कान लढाईला सज्ज होते. पाय काहीही मोडण्यास तयार होते. पण सुदैवाने तो गजराज दुसरीकडे वळला आणि झाडे पाडत जंगलात घुसला. तत्क्षणी सगळे टॉवरवरून उतरले व गाडीत जाऊन बसले. तरीही प्रत्येकाच्या मनात भीती होती की तो गजराज परत नाही ना येणार?

सगळे गाडीत बसल्यावर गाड्या धूर सोडत सुसाट सुटल्या. त्या कॅम्पवर येऊनच थांबल्या.

□

---

पान क्र. २० वरून

भरू लागले. तेवढ्यात देवाने पाठविल्या-सारखा एक धनगर पळत आला. आम्ही त्याला विनवणी केली. त्याने चपलांना सुखरूप बाहेर काढले. मग आमच्या जिवांत जीव आला. तसेच मजल दरमजल करत आम्ही निघालो. आई-बाबांची आठवण येऊ लागली. पण शेवटी वर पोहोचलो.

तेथे देवटाक्यातले पाणी प्यायल्यावर आम्हाला अमृत प्यायल्यासारखे वाटले. नंतर हिंडून खेळून परत जायला निघालो. पण व्यवस्थित चढल्यामुळे आम्हाला आत्मविश्वास आला होता. सगळे पळत सुटले होते. मी सईताईला गाठण्याच्या नादात जोरात पळाले. पुढे एक मोठी भेग होती. पुढे दरी, मागे डोंगर. अशावेळी ते पाचजण जोरात ओरडले, मिंटीऽऽ. ते पाच प्रतिध्वनी माझ्या कानावर आदळले. मी गाडीचा ब्रेक लावतात तशी एकदम थांबले. तो दिवस माझ्या जीवन मरणाचा दिवस होता. काळ आला होता पण वेळ आली नव्हती. माझी आयुष्याची दोरी बळकट होती म्हणूनच मी त्या दिवशी वाचले.

□

# आमचा कॅम्प

शेखर कांबळे (आपली शाळा), इ. ६ वीत असताना

दुपारची वेळ होती. मी शनिवारी कॅम्पला गेलो. आम्ही सर्व टेंपोमधे बसून गेलो होतो. टेंपोमधे बसल्यावर असे वाटायचे जत्रा भरली आहे. त्या जत्रेत मधेच गाण्याचा गोंधळ ऐकू येऊ लागला. नंतर कुठे अशी वेळ आली की आम्ही पोहचलो. सरांनी आम्हा सर्वांना व्यवस्थित खाली उतरवले. आमच्याबरोबर चार शिक्षक व दोन शिक्षिका आल्या होत्या. सर्व सामान एका झाडाखाली ठरलेल्या ठिकाणी लावले.

यानंतर सरांनी साफसफाई करावयास लावली. तेही काम उरकले. नंतर चहा केला. चहा प्यायल्यानंतर असे वाटले की हा चहा मी जीवनभर विसरणार नाही. स्काऊट काय हा प्रश्न माझ्या मनात घोळत होता. आम्ही गरिबांची मुले. आम्हाला यातील काय कळणार? त्यानंतर आम्ही खेळलो. खेळताना असे वाटायचे की आज आम्ही मनसोक्त खेळलो. नंतर पाटील सरांनी व रवी सरांनी धरणावर नेले. धरणावर आम्हाला चढायला, उतरायला खूप आनंद वाटायचा. आम्ही सर्व धरणात उतरलो. सुदैवाने त्यात पाणी नव्हते. त्यात खेळ म्हणजे कबड्डी व लगोरीचा. कबड्डीमधे आगळीवेगळी मजा आली. खेळून आल्यावर जेवण केले. ते जेवण खाताना असे वाटायचे की हे जेवण पाची पक्वान्न आहे. रात्री शेकोटी केली व आम्ही शेकाटीच्या कडेने बसलो. कार्यक्रम सुरू झाला. काहींनी ब्रेक डान्स केला. काहींनी नाटक केले तर काहींनी नकला केल्या.

मीही आमच्या टीमच्या वतीने एक नाटक केले. नाटक खूपच छान झाले व नंतर हिंदी गाण्यांच्या भेंड्या सुरू झाल्या. भेंड्यांमधे चढाओढ लागली होती. सर फारच जुनी गाणी म्हणत होते. यामधे कोणीच हरले नाही. हसत खेळत रात्र गेली.

परत दिवस उजाडला. आम्ही आधी खूप कंटाळलेलो व आळसलेलो होतो. प्रथमच आमच्या गटातील रोहितने चहा बनवला. चहा प्यायलो. यानंतर आम्ही रनिंगला गेलो. रनिंग झाल्यावर आळस गेला. रनिंग केल्यानंतर पोहे खाल्ले. नंतर सरांनी घनदाट जंगलात खजिना लपवला. खजिना होता बिस्किटांचा पुडा. तो एका मुलाला सापडला. सापडलेल्या पुड्यातील बिस्किटे खाल्ली. बिस्किटे खाल्ल्यावर जेवण केले व थोडा वेळ विश्रांती घेतली.

पान क्र. २७ वर पहा

# चंडोल

वसिम मणेर, इ. ९ वी

त्या दिवशी मी विंचुर्णीच्या माळावर काळ्या पोटाच्या चंडोलाचे (black bellied finch lark) चे घरटे शोधत होतो. गेल्याच वर्षी म्हातारबाबांनी मला सांगितलं होतं की माळचिमण्या याच सुमारास घरटी बांधतात.

मी निसर्गमंडळाचा सदस्य असल्याने घरटी शोधायची दृष्टी लाभली होती. घरटी शोधायची नसतात. त्याचे बिल्डर शोधायचे असतात. म्हणजे घरटे सापडते. कारण आई-बाबा चिमुकल्यांसाठी चारा घेऊन येत असतात.

अचानक एक चंडोल तोंडात लाल पायाच्या नाकतोड्यास घेऊन माझ्या शेजारच्या दगडावर येऊन विसावला. बहुधा त्याला नाकतोडा पकडताना खूप श्रम पडले असावेत. तो किडा घेऊन आलाय म्हणजे जवळपास कोठेतरी त्याचं घरटं नक्कीच असणार हे मी हेरलं.

त्याच्याकडे बघताबघता मला एकदम तो दिवस आठवला. त्यावेळी आमचं निसर्गमंडळ वगैरे काही नव्हतं. मी रॉकेल आणायला उपळव्याला गेलो होतो. उपळवे फलटणच्या दक्षिणेकडील महादेव डोंगर-रांगांच्या पायथ्याशी आहे.

मी उशिरा आल्यामुळे माझी बस चुकली. मी गाव सोडून पुढे आलो. तेथे एक चौक होता. आजूबाजूला जिरायती शेती होती. पाण्याअभावी पिके घोट्याएवढीच वाढलेली होती. बाकी सर्वत्र तुरळक गवत होते. मी तेथे बसलो. अचानक एक चंडोल तोंडात किडा घेऊन शेजारच्या दगडावर बसला. मला काही काम नसल्यामुळे मी शांतपणे त्याचे निरीक्षण करत बसलो. त्याने इकडेतिकडे शत्रूची चाहूल घेतली आणि तो गवतात



शिरला. तेथे त्याची दोन पिले सुखावली होती. तो जवळ जाताच पिले अधाशासारखी तोंड उघडून घास घेण्याचा प्रयत्न करू लागली. तेव्हा मला पुस्तकातले वाक्य आठवले. पुस्तकात लिहिले होते की आई-बाप आल्यावर पिले गोंधळ करतात. पण येथे पिले कसलाच आवाज करत नव्हती. ही गोष्ट मला विलक्षण वाटली. नर पिलांना घास देऊन

दूर उडाला. आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीने आणि मनाला हुरहूर लावणारी शीळ घालीत निघून गेला.

मी घरट्याजवळ गेलो. दोन मातकट रंगाची पिले आत पडून होती. मी त्यांच्या घरट्यास हात लावला. पण पिले शांत पडून होती. मला पुन्हा गंमत वाटली कारण मी वाचले होते की घरट्यास हात लावल्यावर पिले ओरडतात म्हणून. मला एक गंमत सुचली. मी लगेच कामाला लागलो. सगळे दगड उलटवले तेव्हा एक विंचू सापडला. काड्यांच्या साहाय्याने वीष पिशवी तोडली आणि त्याला घरट्याजवळ आणून ठेवले आणि पुन्हा दूर जाऊन बसलो.

थोड्या वेळाने चंडोल आला व पिले उतावळी झाली. त्याचबरोबर तो विंचूही आपली वीष पिशवी नसलेली शेपूट वर खाली करू लागला. चंडोलाने इतक्या पटकन घास पिलांच्या तोंडी टाकला व विंचूही दूर फेकला की मला क्षणभर काहीच दिसले नाही. चंडोल थोडा विसावला आणि उडाला. मी पाहिले बिचारा विंचू मेला होता. मी फडफडण्याच्या आवाजाने भानावर आलो. चंडोल थोडी विश्रांती घेऊन नाकतोडा घेऊन उडाला होता. थोड्याच अंतरावर त्याचं घरटं होतं.

मी आता सॅक सावरली. आता घरी जायचे होते. घरटे तर सापडले होते. उद्यापासून घरटयाचा शास्त्रीय अभ्यास करायचा होता. मी घरी परतलो ते एक अनामिक आनंद घेऊन.

□

---

पान क्र. २५ वरून

पुन्हा उडून जाण्याची तयारी केली. टेम्पो आला. टेम्पोत सामान भरले. कॅम्पचे हे दोन दिवस आम्हाला दोन तासांप्रमाणे वाटले. टेम्पोत बसलो व फलटणला परतलो.

आम्हाला पुन्हा पुढच्या वर्षी कँपला जायला मिळेल का ?

□

# घुबी

समीरा कुरेशी, इ. ८ वीत असताना



आमच्या बागेत एक घुबड पडलंय म्हणून नंदिनी मावशीचा फोन आला. लगेच आम्ही ते बघायला गेलो. ते जिवंत होतं आणि हात पुढे केला तर चोच मारायचा प्रयत्न करीत होतं. आईनं त्याला हातमोजे घालून उचललं आणि घरी आणलं. आमच्या घरी तीन मांजरं. त्यामुळे आम्ही त्याला बाथरूममध्ये कोंडून ठेवलं. त्याचे दोन्हीही पाय लुळे पडले होते. शिवाय पंखालाही दुखापत झाली होती. त्यामुळे ते चालू किंवा उडू शकत नव्हते.

कोणी म्हणे त्याला शॉक बसल्याने पांगळे झाले आहे. कोणी म्हणे आजारपणाने, तर कोणी म्हणे विषबाधेने. पहिल्या दिवशी त्याला उकडलेले अंडे देऊन पाहिले. पण घासच घेईना. बळेच तोंडात कोंबले तरी थुंकून टाकी. मग दुसऱ्या दिवशी त्याच्यासाठी मटण आणले. पाय लुळे पडले असल्याने त्याला ते पायात धरून चोचीने ओढून तोडता येइना. तेव्हा त्याला छोटे छोटे तुकडे करून दिले. तुकडा बोटावर ठेवून बोट पुढे केलं की ते पटकन तुकडा उचलून घेई. त्यात चरबी, छिचडे आल्यास थुंकून टाकी.

आम्ही त्याला सकाळ संध्याकाळ खायला घालत असू. रात्री ते खूप तार स्वरात किंचाळताना ऐकू आले. गंमत म्हणजे बाहेरूनही प्रतिसाद मिळाला. मग आम्ही त्याला लगेच गच्चीत ठेवले. कावळ्या गिधाडांच्या भितीने त्याला रोज

पान क्र. ३२ वर पहा

# लांडग्याच्या शोधात

धनंजय निंबाळकर, इ. ९ वी

माझं गाव विंचुर्णी. फलटणच्या दक्षिणेला असलेलं एक लहानसं गाव. गावात रामोशी जमात फार पूर्वीपासून राहते. रामोशी लोक हाडाचे शिकारी.

आमच्या मळ्यात एक आप्पा रामोशी राहतो. आप्पाने होल्यापासून हरणापर्यंत शिकारी केलेल्या आहेत. पशुपक्ष्यांबद्दल त्याला बरीच माहिती आहे. एखादा ससा कुठे घावेल ते तो बरोबर सांगू शकतो. एखादा स्थलांतरित पक्षी केव्हा येईल व केव्हा माघारी जाईल हेही त्याला माहीत असते. फक्त त्या पक्ष्यांची ग्रामीण नावे त्याला सांगावी लागतात. मीही त्याच्या बरोबर घोरपडी, ससे, तितर मारलेत. पण माझ्या शाळेत निसर्ग मंडळ सुरू झाल्यापासून मी ते सर्व सोडलं. पण तो काही ऐकत नाही.

एकदा मी त्याच्याबरोबर बैल बांधायला चाललो होतो. तो सांगत होता की माझे आजोबा आपला घोडा आणि चारपाच कुत्री घेऊन शिकारीला जात. आपल्याकडे असलेलं हरणी नावाचं हरीण त्यांनी आधीच कुरणात बांधून ठेवलेलं असायचं.

गप्पा मारीत जाता जाता माझ्या पायाला काहीतरी ओलसर लागलं. खाली पाहतो तर अर्धवट खाल्लेलं कोकरू. आप्पानं ते पिलू उचललं व मला म्हणाला, 'धनू, सांच्याला या जेवाय'. मी म्हणालो, 'लांडग्याचं उष्टं दिसतंय'. तो म्हणाला, 'त्याला काय मरतंय?' मी म्हटलं, 'इथं लांडगी आहेत का?' दूरवर एक काटेरी वन दाखवीत तो म्हणाला, 'गेल्या म्हयन्यात मी



न् न्हानबानं तिथं एक लांडगी अन् तिची पिली पाह्यली होती'. आम्ही चांगलं गवत बघून बैलं बांधली आणि घरी आलो.

आल्यावर मी माझ्या निसर्ग मित्रांना ही बातमी सांगितली. ते खूष झाले.

लांडगी आणि पिले बघायला आम्ही चौघा-पाचजणांनी जायचं ठरवलं. दुपारी दोन वाजता मळ्यात पोचलो. सायकली ठेवता ठेवताच गुलाबी मैनांचा **(Rosy pastor)** एक थवा दिसला. जेवणे करून आम्ही निघालो. वाटेत कावळीची जाळी लागली. आत मधमाशांची पोळी होती. काही ठिकाणी आत शिरताही येत नव्हते इतकं गचपण होतं. तेव्हा त्या जाळीच्या वाटे न लागता पुढे निघालो.

कोर्सर, तीतर, बटेर, चंडोल असे असंख्य माळपक्षी दर्शन देऊन गेले. विविध रंगांची फुलपाखरे इकडून तिकडे उडत होती.

आम्ही मळा सोडून माळावर आलो. गवत चांगलं चार फूट उंच वाढलं होतं. वर एक पाझर तलाव होता. पाणी थोडंसच होतं. पण चार व्हाईट नेक्ड स्टॉर्क्स् दिसले. आम्हाला पाहून ते इतके वर उडाले की आकाशात ठिपक्यांसारखे दिसले. पुढे सामाजिक वनीकरणाची झाडे वाळून चाललेली होती. माळ संपून आम्ही पुन्हा उतरायला लागलो होतो.

डोंगर रांग अगदी जवळ आल्यासारखी वाटत होती. पुन्हा एक कोरडा तलाव लागला. तलावाच्या भिंतीत एक बीळ दिसलं. बिळासमोरच्या मोकळ्या मातीत नख्या उमटल्या होत्या. बहुधा घोरपडीचं असावं. समोर काटेरी वन दिसायला लागलं होतं. आम्ही जरा थबकलो. पायांवर हजारो बाण मारावेत अशी कुसळं टोचली होती. समोरच एक मेलेली मण्यार दिसली. आम्ही न बोलता एकदम शांत झालो होतो. जवळच्या गवतातून एक चंडोल फर्रकन् उडाला. सगळेच दचकले. वनाच्या तोंडाशीच ताजी विष्ठा सापडली. पण त्यात केस नव्हते. होत्या बोराच्या बिया. तेव्हा विष्ठा बहुधा खोकडाची किंवा कोल्ह्याची असावी.

वेड्या बाभळीच्या त्या वनात शिरताना भीती वाटत होती. पण तसेच शिरलो. खाली मोठाली बिळे होती. पण लांडग्यांचा कुठे मागमूसही नव्हता. आम्ही वनाला वेढा घालून परत बाहेर निघालो. तो एक बैलगाडीवाला भेटला. त्याला लांडग्यांबद्दल विचारल्यावर तो म्हणाला लांडगे त्या तिथं पुढच्या काटाड्यात असतील. आमची जागा चुकली होती. पण संध्याकाळ झाली होती. पाच तास चालून पायही बोलायला लागले होते. म्हणून मुकाट्यानं परतीची वाट धरली.

काहीच दिसले नाही असे म्हणत खूप काही दिसले होते. निसर्गात एखादे ठराविक उद्दिष्ट ठेवून जायचे नसते. कारण मग आपले लक्ष त्याच उद्दिष्टाकडे राहते. इतर गोष्टी खूप असतात. मात्र त्यांना पाहण्यासाठी आपल्याला ती दृष्टी लागते. घडणाऱ्या घटना काही तरी बोलत असतात. त्या ऐकण्यासाठी कान लागतात. परतीच्या वाटेवर गवत चांगलं उंच वाढलं होतं. मात्र त्या गवताला खाणाऱ्या हरणांची जागा मात्र शेळ्यांनी घेतली होती.

जर त्या शेळ्यांच्या जागी हरणं असती तर आज ही निसर्ग मंडळं स्थापन करण्याची काही जरूरच नसती. □

# श्रमाची फुले

श्रेयस केसकर, इ. ६ वी

आळस हा माणसाचा शत्रू आहे. जी माणसे कामचुकारपणा करतात ती कधीच प्रगती साधू शकत नाहीत. ज्यांनी जीवनात आळसाला थारा दिला नाही ते जीवनात यशस्वी झाल्याचे आपण पाहतो. भविष्य काळ उज्वल बनवायचा असेल तर आपण आळस झटकला पाहिजे. कोणतेही कष्ट करताना लाजू नये. कारण कोणतेही काम कनिष्ठ नसते. ज्या देशात लोक आळस न करता आपापली कामे करतात तोच देश भरभराटीस येतो. जपानचे उदाहरण याबाबत आदर्श मानता येईल. एकदा एका ऋषींना आपल्या विद्यार्थ्यांना कष्टाचे महत्त्व पटवून द्यायचे होते. ते त्यांना घेऊन रानात गेले. तेथे दिवसभर त्यांनी खूप काम केले. लाकडे गोळा केली व सूर्यास्ताला थकून भागून सर्व गुरूंसह परतले. दुसऱ्या दिवशी त्यांना सुगंधानेच जागा भरून गेलेली आढळली. रानातून झोपडीकडे येणाऱ्या वाटेवर सुंदर फुले उमलली होती. मुलांनी गुरूंना विचारले कसली ही फुले? तेव्हा गुरुजी उत्तरले, 'ही तुमच्या घामाची, तुमच्या श्रमाची फुले आहेत!' □

**चिमणी**

चिवचिव चिमणी चिवचिव करते
इकडून तिकडे झाडावर उडते
रंग तिचा करडा करडा
करते सारखा आरडा ओरडा.

सुप्रिया कांबळे
इ. १ ली

# वसंत ऋतू

योगेश काळे इ. ६ वी

जशा दहा दिशा तसेच वर्षात सहा ऋतू मानले जातात. परंतु उन्हाळा, हिवाळा व पावसाळा हे ऋतू महत्त्वपूर्ण मानले जातात. सर्व ऋतूत सर्वश्रेष्ठ मानला जातो वसंत ऋतू. म्हणजे ऋतुराजाच्या मुलानं स्वतः काढलेल्या चित्रात फक्त हिरवाच रंग भरला आहे असं वाटतं.

वसंत ऋतूच्या आधी झाडांची पाने गळून पडतात व वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटते. त्याच वेळी पतझड सावन बसंत बहार ही गाण्यातली ओळ मला आठवते.

याच वेळी आंब्याचा नवा मोहर येऊन त्याचा सुवास दाही दिशांना दरवळत असतो. जणुकाही तो सुवास आपल्याला म्हणत असतो, अरे असा दुरूनच फक्त वास घेऊ नका. आंब्याच्या झाडाला तर लहान कैऱ्या सुद्धा लटकत आहेत. हेच जणू काही कोकिळेला कळलेले असते व तो हर्षीत होउन वसंताला साद घालत असतो.

सगळी धरती तऱ्हतऱ्हेच्या फुलांनी, त्यांच्या सुवासानी व आनंदानी बहरून गेलेली असते. म्हणूनच आमच्या हिंदीच्या पुस्तकात

तन खूश होता,
मन खूश होता,
जब वसंत ऋतु आता है ।

असे सोहनलाल द्विवेदी यांनी म्हटले आहे. □

---

पान क्र. २८ वरून

सकाळी लवकर आत आणून ठेवावे लागे. त्याचे आईवडील रोज यायचे. कॅझुरिनाच्या उंच झाडावर रोज सकाळी ७-८ वाजेपर्यंत बसून असायचे. आम्ही त्या घुबडाचे नाव ठेवले घुबी.

चौथ्या दिवशी त्याचे खाणे बंद झाले. धडपडत, खुरडत, सरपटत इकडे तिकडे फिरल्याने पायांना जखमा होऊन रक्त वाहू लागले होते. पाणी देखील ड्रॉपरने जबरदस्तीने पाजावे लागत होते.

पाचव्या दिवशी त्याचे आईवडील सकाळी १० वाजेपर्यंत झाडावर बसून होते. त्याच दिवशी दुपारी कधीतरी ते मेले. आम्हाला मात्र अजूनही आठवतात त्याचे काळेभोर डोळे, मऊमऊ पिसे आणि लाडात मारलेली चोच.

□


एके दिवशी संध्याकाळी काही तरी पांढरे पांढरे जंगलातून उडत बाहेर पडले. माणसे घाबरून गेली. पोरे आजारी पडू लागली. माणसे जंगलात जायला घाबरू लागल्याने जंगलतोड आपसुकच थांबली.

माझा या भुतावर अजिबात विश्वास नव्हता. तेव्हा आम्ही मुलांनी एक निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी सर्वांनी रात्री ११ वाजता मारुतीच्या मंदिराजवळ जमायचे ठरले. तरीही ऐन वेळी दोनच मित्र उगवले. पण ठरवल्याप्रमाणे आम्ही जंगलाच्या दिशेने गेलो. सगळे जण आतून जाम घाबरले होते. सर्वत्र रातकिड्यांची किरकिर चालू होती. तऱ्हेतऱ्हेच्या प्राण्यांची खसफस व आवाज येत होते. हवेत थंडीचे प्रमाण वाढू लागले होते. आम्ही एकदाचे जंगलात पोहोचलो आणि गावकऱ्यांना जी पांढरी भुते दिसत होती, तीच आम्हाला दिसली. आम्ही थरथरत त्या भुतांवर टॉर्च मारला. ती तीन बार्न आऊल्स होती. डोक्यावरचे मोठे ओझे उतरल्यासारखे आम्ही मटकन खाली बसलो. आम्ही ठरवलं, हे गावकऱ्यांना सांगायचं नाही. ते त्या घुबडांना भूत मानत होते. जर ती घुबडे आहेत हे त्यांना कळले तर ते पुन्हा जंगलतोड चालू करतील. भूत ही अंधश्रद्धा असली तरी त्यामुळे अनेक प्राण्यांचे, झाडांचे जीवन वाचत होते. म्हणून तेरी भी चुप और मेरी भी चुप.

□

# तीन भुतांची करामत

प्रकाश अनभुले, इ. ८ वीत असताना



आमचे गाव म्हणजे निसर्गाच्या ओंजळीत वसलेले एक सुंदर पानच. चारही बाजूंनी डोंगर आणि मध्ये वहात येणारी एक नदी. त्या नदीवर आमची शेती चालायची. गावात सर्वत्र जंगलासारखी झाडी होती. पण आमचे गावकरी एकदा पैशाच्या मागे लागले. शेतीपेक्षा जंगलात अधिक पैसा दिसू लागला. जो तो जंगल तोड करून धनी बनू लागला. जंगलावर मोठे संकट आले.

त्याच सुमारास आम्ही मुलं विश्व प्रकृती निधीचे सभासद बनलो होतो. पण जंगजंग पछाडूनही आम्ही जंगलतोड थांबवू शकत नव्हतो. लोक या जंगलाचे माळरान करू लागले होते. आम्ही दर शनिवारी झपाट्याने कमी होणाऱ्या जंगलात जायचो. प्राणी-पक्षी-फुले पहायचो. मजा करायचो.

# घर अन् इतर काही

**घर**

एक होते घर
घर होते फार सुंदर
घराभोवती हिरवे रान
रानात येती फुलपाखरे छान
घराभोवती खूप झाडे
झाडावर बसती दोन माकडे
घराला होते लाल लाल छप्पर
त्यावर चढती माकडे भरभर
घराला होत्या सुंदर भिंती
वेलांना जणू आधार देती
घराला होते दार छानसे
येती जाती त्यातून माणसे

अमृता राजदेरकर
इ. ३ री

**शिकवणूक**

आंब्याचं झाड डेरेदार
पानामध्ये कैऱ्या हिरव्यागार
आंबे झाले कैऱ्यांचे
बेत चालले खाण्याचे

राजू चढला झाडावर
काढत होता आंबा
तिकडून आला माळीदादा
ओरडून म्हणाला थांबा

राजू खाली उतरला
माळीदादा म्हणाला
आंबा देतो प्रत्येकाला
आंब्यासाठी चोरी
करता कशाला?

गौरी इंगळे
इ. ३ री

**भाकरी**

एक होती भाकरी
तव्यावर टाकली
भाजून भाजून
पटकन फुगली
फुगून फुगून
पटकन फुटली
माणसाच्या तोंडात
जाऊन खुदकन हसली

अमेय रुद्रभटे
इ. ४ थी

**रात की बात**

रात ने मुझे बतायी एक बात।
मैं आयी तो होता है अँधेरा,
सुरज आया तो होता है सबेरा।
मैं आयी तो सोते है,
सुरज आया तो सब उठते है।
मैं अकेली हूँ, कोई नहीं मेरे साथ
यह बतायी रात ने मुझे बात।

सुहास माने
इ. ८ वी

# गोष्ट दुर्दैवी बिबळ्याची


नूरी राजवंशी, इ. ९ वी

हल्ली जो तो वाईट कृत्ये करत असतो. इथे जो तो म्हणजे माणसेच बरे! रोजचे वर्तमानपत्र खून, चोऱ्या, दरोडे यांनी भरलेले असते. थोडीशी जागा असते ती राजकारणातील भ्रष्टाचारासाठी. याच कृत्यात एक असे कृत्य की ज्याचे पाप मनुष्य जन्मभर फेडू शकणार नाही.

२४ डिसेंबर १९९५ रोजी एक बिबट्या गावात आला. तो झुडपात लपलेला एका बाईला दिसला. मानवी प्रवृत्तीच ती! या टोकापासून त्या टोकापर्यंच्या सर्व लोकांना ही बातमी कळली. सर्व लोक जमले. लोकांचा स्वभावच असा असतो की कोणी स्वस्थ बसलेले अथवा चांगले केलेले कुणालाच आवडत नाही. प्राणीसंग्रहालयच पहा ना! तिथे किती निर्दयपणे लोक प्राण्यांना काठ्या टोचत असतात, दगड फेकून मारत असतात. एकदा असंच माणसांना पिंजऱ्यात ठेवून प्राण्यांनी त्याना चिडवलं की कळेल सगळ्यांना! पण जाऊ देत.

आता, ते निर्सगाचं लेकरू, जे शहरात आलेलं होतं, भर वस्तीत, तेही कोल्हापूरच्या, त्याला लोकांनी त्रास द्यायला सुरुवात केली. कोल्हापूर हे काही लहान गाव नाही आणि तुम्हाला माहित असेल की तेथे कोल्हापूर विभागाचं विश्व प्रकृती निधीचे केंद्रही आहे. लोकांना त्यांना फोन करून वेळेवर कळवता आले असते. मग त्यांना काही तरी करून त्याला वाचवता आले असते व योग्य त्या ठिकाणी पोहोचविता आले असते. पण नाही! एक बाई चुकून बिबट्याच्या समोर गेली. अर्थातच बिबट्याने आपला सगळा राग तिच्यावर काढला व ती संपलीच!

त्या दुर्दैवी जनावराला पहायला ही गर्दी जमली. पोलिसच बोलवावे लागले शेवटी.



पण ते तरी काय करू शकणार? गर्दी इतकी होती की गोळीबार करावा तर गोळी बिबळ्याला लागण्याच्या ऐवजी माणसालाच लागायची.

शेवटी बिबळ्याचे नशीब फिरले. माणसाने डाव साधला. नाहक बळी गेलं ते लेकरू. निर्सगप्रेमी हळहळले.

आता लोकांनी काय करायला पाहिजे होतं हे सांगून काय उपयोग? जे व्हायचं ते झालं! पण माझं या बावत प्रामाणिक मत असं की झालं ते फार वाईट झालं व मानवी कृत्याला काळिमा फासणारं झालं. दुःख तर वाटतंच. पण दुःखापेक्षा राग जास्त येतो. प्रत्येकालाच वन्य प्राण्यांच्या हत्येबद्दल असा राग आला तरच आपण काही निसर्ग वाचवू शकू!

□

# चालू घडामोडी

**देवाचे अस्तित्व**

घेतला दगूड त्यावर ओतला शेंदूर.
म्हसोबा म्हणून झाला गोंधूळ.
येता जाता पाया पडतो
पण देव आम्हा कधी ना पावतो.
देव कुठे दिसत नाही.
कारण त्याचे अस्तित्वच नाही.

किशोर माने
इ. ९ वी

**शेषन**

ग्रेट आहात तुम्ही शेषन
निवडणुकांचे नाव केलेत तुम्ही रोशन
साऱ्यांनाच आले टेन्शन
ग्रेट आहात तुम्ही शेषन
लाचखोरीवर तुम्हीच जालीम लोशन
ग्रेट आहात तुम्ही शेषन
झाले आहे सक्सेस इलेक्शन
ग्रेट आहात तुम्ही शेषन
पाळलेत तुम्ही आपले आश्वासन
ग्रेट आहात तुम्ही शेषन
जे करत आहेत देशाचे भक्षण
त्यांच्यापासून करा देशाचे रक्षण
ग्रेट आहात तुम्ही शेषन

योगेश काळे
इ. ६ वी

**भूकंप**

गोष्ट काल परवाची
किल्लारी गावाची
झोपले होते गाव आनंदात
कोणी स्वप्ने रंगवीत
कोणी साखरझोपेत
रेषा रेषांचे गणित
अचानक विस्कटले
किल्लारीच्या ललाटाने
दुःख ओसाने घेतले
झाली पहाट अनोखी
सूर्य उगवला काळा
दीर्घ उघडले डोळे
उघडेच राहियले
भूकंप आला दौडत किल्लारीला
गेला दौडत परत
त्याने किती संपवले
त्याचे माप न राहिले

स्वरजीत साळवे
इ. ५ वी (आपली शाळा)

**अंधश्रद्धा**

माझा भुताखेतांवर विश्वास नाही
या भाकड कथांवर मी विश्वास ठेवत नाही.

म्हणतात लोक मुंजा आहे पिंपळाखाली
तर कोण म्हणे वडाखाली खविसभाई.

म्हणतात लोक देवीला नवस करा
बकरं कापा रक्ताचा अभिषेक करा.

अहो आलं विज्ञान युग आता
काय घेऊन बसता भुताखेता?

अभिजित फणसे
इ. ४ थी

# ताडोबाचे दिवस

**वाघाची समजूत**

ताडोबा आलं ताडोबा आलं
मोठं जंगल आम्ही पाहिलं.
पानगळीचं जंगल मोठं
प्राणी पक्षी हिंडत होते.
चालून चालून पाय दुखले
पाणी मात्र सारं संपलं.
पाणी पिऊन मन हर्षलं.
सरांनी दिली माहिती
जंगलाशी झाली दोस्ती.
वाघ मात्र चिडला होता
जंगलात दूरवर लपला होता.
गव्यानं मात्र दर्शन दिलं
आम्हाला पाहून निघून गेलं.
उन्हाळ्यानं जोर चढवला
आमचा भाजलेला बटाटा झाला.

पण ते सोडावं लागणार होतं
फलटणला परत यायचं होतं.
मित्रांना निरोप द्यायचा होता
पण तोंडही उघडत नव्हतं.
मनात एक आशा होती
मित्रांना परत भेटायचं होतं.
गमती जमती सांगायच्या होत्या
परत कधी तरी यायचं होतं
वाघाची समजूत घालायची होती.

समीरा कुरेशी
इ. ९ वी



# निरोप

## चारोळ्या

कल्पना म्हणजे माळावरचं गवत नाही
केव्हाही डोक्यात यायला.
विचारांची सात वर्षे जावी लागतात
कल्पनेची एक कारवी फुलायला.

भावनांच्या सागराला
अश्रुंची नदी मिळते,
मग दुःखाच्या पाण्याला
डोळ्यातून वाट मिळते.

प्रेमाला भावना नसतात
व्यक्तीची जाणीव नसते
तरीही याच निर्जीव धाग्याने
प्रत्येक नाते जोडले जाते.

महेश सावंत
इ. ९ वी

## "बा म्हणतु"

बा म्हणतु, 'सकाळच्या पारी धरजा दारी
तिनीसांज झाल्याबिगीर येऊ नगं घरी
मग तुम्हीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?
अवं चुकून आलो साळत
तर बा ईतू मागनं पळत
हानत मारत नेतो घरी
अन् घरी पाटानीवर आसुडाची दूरी.
भ्यानं जातो रानात पळत
मग तुम्हीच सांगा मास्तर
इऊ कसा साळत?
एकदा म्हणला आरं मर्दा
जमनीला कर कागुद
आन् खुरप्याला कर पेन
अन् वढ त्याज्यावर रेगा
अन् मंग भर गड्या पैक्याच्या बैगा.
वरनं म्हणतु तुला नाय कळत
मग तुमीच सांगा मास्तर
इऊ कसा साळत?
अरं नाय जायचं साळत
मळ्यात बसायचं राखान करत
मंग आयचा बी काय इलाज नाय चालत
मग तुमीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?
मायनं म्हणलं आरं लेकरा
परकासा सारकं सूख पसरत जा
अन् दुःकाला अंधारात लपवीत जा
मंग त्याजं बी म्हणणं मला असतं कळत
मग तुमीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?

प्रकाश अनभुले
इ. ८ वीत असताना

# आठवणीतले फोटो



दोस्त (१९९३ मधे टिपलेला क्षण).
डावीकडून श्याम अहिवळे, लक्ष्मण अहिवळे,
अमित निकाळजे, भूपाल शिंदे.



किशोर माने आणि प्रकाश अनभुले चौथीत असताना.



गणपतीपुळ्याला प्रगत शिक्षण संस्थेच्या शिक्षक आणि स्टाफची सहल.
त्या वेळी बरोबर आलेली मुले डावीकडून संदीप ढेंबरे, मनीषा ढेंबरे, संजय माने.

# आठवणीतले फोटो



कमला निंबकर बालभवनच्या पहिल्या सहलीला निघत असताना.
डावीकडून स्मितातार्इ, नूरी राजवंशी, मॅक्सीनआजी, प्रकाश अनभुले.



विश्व प्रकृती निधी (भारत) कोल्हापूर विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर
विंचुर्णी येथे निसर्ग मंडळाची सहल.